(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**<u>वनजमीन-गडचिरोली</u>**

सुरजागड उप पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरिता ५.०० हे. राखीव वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-२०१८/प्र.क्र.२१३/फ-१०**

**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२**

**दिनांक: ११.०९.२०१८**

<u>वाचा</u>:-

१. पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. F.No.११-०९/१९९८/ FC(LWE), दि.१५.०२.२०१८
२. महसूल व वन विभाग,महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एफएलडी-२०१८/प्र.क्र.१४३/फ-१०, दि.१५.०५.२०१८
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. Desk-१७/१/ID/८२८/१८-१९, दि.१०.०७.२०१८
४. महसूल व वन विभाग,महाराष्ट्र शासन पत्र समक्रमांक दि.२१.०८.२०१८ (बैठकीचे इतिवृत्त)

<u>प्रस्तावना:-</u>

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी उक्त पत्र क्र. २ अन्वये पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना सुरजागड उप पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरीता सुरजागड बांदे, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ५.०० हे. राखीव वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणाचा प्रस्ताव राज्य शासनास सादर केला आहे. केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. १ येथे नमूद पत्रामधील निर्देशांच्या अनुषंगाने नक्षल प्रभावित भागातील सार्वजनिक प्रकल्पांकरीता वनजमीन वळती होणा-या प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरीता सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.०९.०८.२०१७ रोजीच्या बैठकीत सुरजागड उप पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरिता ५.०० हे. राखीव वनजमीन वळती करण्याबाबतच्या प्रस्तावावर विचार करण्यात आला. समितीने सदर प्रकल्पासाठी ५.०० हे. वनजमीन वळती करण्याची शिफारस राज्य शासनास केली आहे.

**शासन निर्णय :-**

भारत सरकारचे आदेश क्रमांक F.No.११-०९/१९९८/FC(LWE), दि.१५.०२.२०१८ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.Desk-१७/NC/I/I.D.८२८/१८-१९, दि.१०.०७.२०१८ अन्वये सुरजागड बांदे, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ५.०० हे. येथील राखीव वनजमीन उप पोलीस ठाण्याच्या बांधकामासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अंतर्गत वळती करण्याकरीता सादर केलेल्या प्रस्तावास **तत्त्वत:** मंजूरी देत आहे.

२. सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) वनजमिनीचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करता येणार नाही.

३) प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार प्रस्तावित ५.०० हे. वनजमिनीकरीता नक्त वर्तमान मूल्याची रक्कम अदा करावी लागेल.

४) केंद्र शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस प्रस्तावित ५.०० हे. वनजमिनीकरीता नक्त वर्तमान मूल्याची अतिरिक्त रक्कम अदा करावी लागेल.

५) प्रकल्पाच्या कामादरम्यान कमीत कमी वृक्षतोड होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. वृक्षतोडीचे काम प्राधान्याने महाराष्ट्र वन विकास महामंडळातर्फे करण्यात यावे.

६) प्रस्तावित ५ हे. वनजमिनीची हद्द निश्चित करून त्यास कुंपण घालण्यात यावे.

७) प्रकल्प यंत्रणेने अंतिम मान्यतेपूर्वी सदर प्रकल्पासाठीच्या प्रशासकीय मान्यतेसंबंधी कागदपत्रे राज्य शासनास सादर करणे आवश्यक राहील.

८) वनजमीन वळतेकरणासंबंधी इतर कायदे, अधिनियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

९) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर उक्त प्रयोजनासाठी वनजमीन वळतीकरणास राज्य शासन अंतिम मंजुरी प्रदान करेल, तद्नंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली हे वरील अटींची पूर्तता झाल्याची खातरजमा करुन प्रत्यक्षात वनजमीन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०९१११७१९२१५०१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.09.11 17:27:52 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रत:-**

१. सचिव, पर्यावरण,वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय,भारत सरकार,नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
८. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),गडचिरोली.
९. जिल्हाधिकारी,गडचिरोली.
१०. उपवनसंरक्षक, भामरागड.
११. पोलीस अधीक्षक,गडचिरोली.
१२. निवडनस्ती (फ-१०).

**Forest Land-Gadchiroli**
Proposal for diversion of 5.00 ha. Forest Land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of Sub Police Station at Surjagad.

**Government of Maharashtra**
**Revenue and Forest Department**
**Government Resolution No.: FLD-2018/CR-213/F-10**
**Mantralaya, Mumbai 400032**
**Date: 11.09.2018**

**Read:**

1. Ministry of Environment, Forests & Climate Change, GoI Letter No. F.No.11-09/1998/FC(LWE), dt.15.02.2018
2. Revenue & Forests Department, GoM Letter No. FLD-2018/C.R.143/F10, dt.15.05.2018
3. APCCF & Nodal Officer, M.S., Nagpur Letter No. Desk-17/1/ID/828/18-19, dt.10.07.2018
4. Revenue & Forests Department, GoM Even No Letter dated 21.08.2018 (Minutes of Meeting)

**Preamble:**

Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer has submitted a Proposal for diversion of 5.00 ha. Reserved Forest Land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of Sub Police Station At-Surjagad Bande Beat, Tal-Etapalli, Dist-Gadchiroli vide above referred letter No. 3. As per the directions issued by the Central Government vide above referred letter No.1, the Government Maharashtra has constituted a Committee under chairmanship of Secretary (Forests) for consideration of proposals for diversion of Forest Land for creation of critical public utility infrastructure facilities in Left Wing Extremism Affected Districts vide above referred Government Resolution No.2.

The Meeting of the above said Committee was held on 09.08.2017. In the said meeting, the Committee has recommended a proposal for diversion of 5.00 ha. Forest Land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of Sub Police Station at Surjagad.

**Government Resolution:-**

In exercise of powers delegated to the State Government, vide Government of India's order no. F.No.11-09/1998/FC (LWE), dt.15.02.2018, Government of Maharashtra is pleased to grant **'in-principle'** approval to the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, vide its letter no. Desk -17/NC/I/I.D-828/18-19, dated 10.07.2018 for diversion of forest land under section-2 of the Forest (Conservation) Act, 1980 for construction of Sub Police Station at At-Surjagad Bande Beat, Tal-Etapalli, Dist-Gadchiroli.

2. This approval is issued subject to the following conditions:-

(a) The legal status of the land will remain unchanged.

(b) The forest land shall not be used for any purpose other than specified in the project.

(c) The Project Authority will defray the cost of the Net Present Value of 5 hectares of forest land proposed for diversion.

(d) The Project Authority will defray the additional / revised cost of Net Present value of forest land as per the latest guidelines of the Government of India.

(e) A Minimum number of trees befitting the purpose and placement of the infrastructure would be felled, care taking to ensure that priority of the user agency is not compromised, and needless felling of trees is avoided. Feasibility of felling of trees through FDCM may be a priority.

(f) The area of 5 hectares would be clearly demarcated and fenced properly.

(g) The project authority shall submit relevant orders of Administrative approval prior to issue of Stage II clearance.

(h) All other conditions as may be mandatory under relevant Acts, Rules & Guidelines shall be complied with by the User Agency.

(i) The final approval shall be granted by the State Government after fulfilment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T.), Gadchiroli.

This Government Resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201809111719215019. This Resolution has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.09.11 17:28:45 +05'30'

**( Virendra Tiwari )**
Additional Principal Chief Conservator of Forests (Mantralaya)

**Copy:-**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Central Zone, Nagpur.
3. Additional Chief Secretary (Home), Home Department, Mantralaya, Mumbai.
4. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai.
5. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.

7. Divisional Commissioner, Nagpur Division, Nagpur.
8. Chief Conservator of Forests (T), Gadchiroli.
9. Collector, Gadchiroli.
10. Deputy Conservator of Forests, Gadchiroli Forests Division, Gadchiroli.
11. Superintendent of Police, Gadchiroli.
12. Select File (F-10)